महासागर

गुरूवार, दि. 31 ऑक्टोबर 2024

अमरावती

पान 3

# आठ मतदारसंघात 248 नामांकन वैध, 41 बाद

## दर्यापूरात सर्वाधिक 20 बाद




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 30 ) -** विधानसभा निवडणुकीसाठी जिल्ह्यातील आठही विधानसभा मतदारसंघात एकूण 273 उमेदवारांनी 341 नामांकन दाखल केले होते. त्यांची छाननी बुधवारी 30 ऑक्टोबर रोजी विधानसभा निहाय करण्यात आली.यात आठही विधानसभेत एकूण 248 अर्ज वैध ठरले असून 41 नामांकन बाद झाले.

यामध्ये सर्वाधिक अर्ज छाननीअंती दर्यापूर मतदार संघात बाद करण्यात आले. 11 उमेदवारांचे 20 अर्ज येथे बाद ठरले आहे. त्यापैकी 38 उमेदवारांचे 32 नामांकन वैध ठरले आहे. बडनेरा मतदार संघात 40 अर्ज वैध ठरले तर 11 उमेदवारांचे सात अर्ज बाद करण्यात आले. अमरावती मतदारसंघात 29 अर्ज वैध ठरले. तिवसा मतदारसंघात 36 नामांकन वैध ठरले. मेळघाट मतदारसंघात सहा नामांकन बाद ठरले तर 24 उमेदवार कायम आहेत. अचलपूर मतदार संघात तीसही उमेदवार कायम आहेत.

### विधानसभा निहाय वैध नामांकन

| विधानसभा | उमेदवार | नामांकन | वैध | बाद |
|---|---|---|---|---|
| बडनेरा | 47 | 58 | 40 | 11 |
| अमरावती | 29 | 37 | 29 | 00 |
| दर्यापूर | 43 | 58 | 32 | 20 |
| अचलपूर | 30 | 39 | 30 | 00 |
| मोर्शी | 32 | 43 | 29 | 04 |
| धामणगाव | 28 | 35 | 28 | 00 |
| तिवसा | 36 | 39 | 36 | 00 |
| मेलघाट | 28 | 32 | 24 | 06 |
| एकूण | 273 | 341 | 248 | 41 |

### 4 नोव्हेंबरकडे सर्वांचे लक्ष

बुधवारी नामांकनाची छाननी होऊन वैध नामांकन व उमेदवारांची संख्या निश्चित झाली आहे. त्यामुळे आता 4 नोव्हेंबर रोजी नामांकन वापस घेण्याच्या शेवटच्या दिवशी कोण माघार घेतो,याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यानंतरच खऱ्या अर्थाने विधानसभा निहाय मुख्य लढत कोणत्या उमेदवारामध्ये आहे हे स्पष्ट होणार आहे.

### 274 जणांनी दाखल केले होते नामांकन

दर्यापूर मतदारसंघातून 43 उमेदवारांनी 58 नामांकन दाखल केले होते. बडनेरा मतदार संघात 47 उमेदवारांनी 58 नामांकन दाखल केले होते. अमरावती मतदारसंघात 29 उमेदवारांनी 37 नामांकन दाखल केले होते. तिवसा मतदारसंघात 36 उमेदवारांनी 39 नामांकन दाखल केले होते. मेळघाट विधानसभेसाठी 28 उमेदवारांनी 32 नामांकन दाखल केले होते. अचलपूर मतदार संघात 30 उमेदवारांनी 39 अर्ज दाखल केले होते. मोर्शी मतदारसंघात 32 उमेदवारांनी 43 नामांकन दाखल केले होते.

मोर्शी मतदारसंघात 29 वैध ठरले तर चार बाद ठरविण्यात आले. झालेल्या छाननीत काही उमेदवारांनी अर्ज दाखल करताना कागदपत्रांची पूर्तता न केल्याने तसेच एकाच उमेदवारांनी दोन दोन अर्ज दाखल केल्याने त्यांची छाननी करून अर्ज बाद करण्यात आले. एकाच उमेदवाराचे दोन अर्ज असल्यास त्यापैकी एक अर्ज वैध ठरविण्यात आला.

# भातकुली निम्न पेढी प्रकल्प निविदा प्रक्रियेत अनियमितता

**मुंबईतील ठक्कर कंपनीच्या चार लोकांसह पाच जणांवर गुन्हा ■ कोणत्या राजकीय पुढाऱ्याच्या छत्रछायेत चालत होता गौडबंगाल ?**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.30 )-** भातकुली तालुक्यातील वासेवाडी शेतशिवारात बांधण्यात आलेल्या निम्न पेढी प्रकल्पासाठी ठक्कर कंपनीने सादर केलेल्या निविदेत मोठी अनियमितता एसीबीच्या तपासात उघडकीस आली आहे. त्यामुळे याप्रकरणात भातकुली पोलिस ठाण्यात मंगळवारी ठक्कर कंपनीच्या चार व एक अन्य आरोपींच्याविरूध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा इतका मोठा प्रकार कोणत्या राजकीय पुढाऱ्याच्या आशीर्वादाने चालत होता याचाही शोध घेणे गरजेचे झाले आहे.




भातकुलीच्या निम्न पेढी प्रकल्पासाठी मुंबईतील एस.एन.ठक्कर कन्स्ट्रक्शन कंपनी, जे.व्ही.ठक्कर कन्स्ट्रक्शन कंपनी आणि डी.ठक्कर कन्स्ट्रक्शन कंपनीच्या संचालकांनी निविदा भरल्या होत्या. यामध्ये चौकशी समितीने केलेल्या तपासणीत निविदेत समाविष्ट असलेली अनेक कागदपत्रे खोटी असल्याचे समोर आले आहे. निविदा काढण्यासाठी ठक्कर कन्स्ट्रक्शन कंपनीने निविदाधारकासह सादर करावयाच्या संबंधित ऐनेकशचरसंदर्भात बनावट कागदपत्रे सादर करून निविदा काढण्याचा हा प्रकार घडला आहे. त्याअंतर्गत निविदा दरासह आवश्यक कागदपत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर फेरफार करून ठक्कर कन्स्ट्रक्शन कंपनीकडून गेल्या 16 वर्षात मोठ्या प्रमाणात फसवणूक करण्यात आली आहे. एसीबीने दिलेल्या तक्रारीच्या आधारे भातकुली पोलिस ठाण्यात कलम 420, 465, 468, 471 आणि 34 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, एस.एन. ठक्कर कन्स्ट्रक्शन कंपनी, जे.व्ही. ठक्कर कन्स्ट्रक्शन कंपनी आणि डी. ठक्कर कन्स्ट्रक्शन कंपनीच्या चार जणांवर आणि एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाशी राजकीय तार जुळलेले असू शकतात, त्यामूळे निवडणूकीमध्ये अश्या व्यक्तीचा चेहरा बाहेर येणे गरजेचे झाले आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत आई, मुलगा ठार

## विचोरी ते अडगाव मार्गावरील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.30 ) -** अज्ञात चारचाकी वाहनाने मोटरसायकलला धडक देऊन झालेल्या अपघातात दोन जण ठार झाल्याची घटना 30 ऑक्टोबर रोजी दुपारी 12 वाजताचे सुमारास घडली. विचोरी ते अडगाव मार्गावर घडलेल्या या अपघातात आई व मुलाचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

प्राप्त माहितीनुसार मोर्शी तालुक्यातील रिद्धपूर येथील मुदतसिर अहमद शेख गफूर (वय 32) व तायराबानो शेख गफूर (वय 65) हे दोघे आई व मुलगा आपली हिरोहोंडा मोटरसायकल क्र.एम एच 27 सी एच 1941 ने रिद्धपूर येथून काही कामानिमित्त नांदगाव पेठ येथे जात होते. दरम्यान समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञात चार चाकी वाहनाने मोटर सायकलला जोरदार धडक दिली. या अपघातात दोघांचाही घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती शिरखेड पोलिसांना दूरध्वनी वरून प्राप्त होताच ठाणेदार सचिन लुले, पो.हे.कॉ. मनोज कळसकर, संतोष लहाने,पो.कॉ. पंकज चौधरी यांनी घटनास्थळी धाव घेऊन नाकाबंदी करून फोर व्हीलर वाहनाचा शोध घेतला. मात्र, अज्ञात वाहन चालक तेथून फरार झाला. शिरखेड पोलिसांनी पंचनामा करून मृतकांचे मृतदेह उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे शवविच्छेदनाकरिता रवाना केले. उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. यांप्रकरणी शिरखेड पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून फरार वाहनाचा व चालकाचा शोध घेणे सुरू केले आहे.

# सामुहीक अत्याचारातील पाच आरोपी जेरबंद

## कारमध्ये नेऊन केला होता अत्याचार



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.30 ) -** घरात क्षुल्लक कारणावरून आईसोबत वाद झाल्याने संतापलेल्या मुलीचे शेगाव नाका चौकातून अपहरण करून नांदगावपेठ रोडवर नेऊन तिच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आला. सदर घटना 29 ऑक्टोबर रोजी रात्री घडली. या घटनेत गाडगेनगर पोलिसांनी अवघ्या दोन तासांत सामूहिक बलात्काराच्या पाच आरोपींना अटक केली आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये मनोज राजरत्न डोंगरे (29, न्यू कॉटन मार्केट, लक्ष्मी नगर), अक्षय धनराज सरदार (29, कपिल वास्तू नगर, आ.), अजय अशोक लोखंडे (28, कपिल वास्तू नगर, अम.), मिलिंद अरुण डहाट (29, रा. भीम नगर) आणि प्रथम गौतम धाडसे (19, मसनगंज) यांचा समावेश आहे. शहरातील रहिवासी असलेल्या फिर्यादी तरुणीचे 29 ऑक्टोबर रोजी रात्री क्षुल्लक कारणावरून आईसोबत भांडण झाले. त्यामुळे चिडलेल्या मुलीने घर सोडून शेगाव नाका चौक गाठला. युवतीने एक मोपेड वाहन थांबवले. मोपेड वाहनावर दोन तरुण होते, त्यांचे वय 30 वर्षे होते. तरुणी त्यांच्या वाहनावर बसली आणि दोन्ही तरुण तिला घेऊन नांदगावपेठ रस्त्याने गेले. आरोपींनी रहाटगाव येथील आदित्य बार येथे वाहन थांबवून बिअरच्या बाटल्या घेतल्या. त्यांनी मित्रांना बोलावून पांढऱ्या रंगाची गाडी मागवली आणि गाडीत बसून नांदगावपेठ रस्त्याच्या दिशेने गाडी वळवली. त्यानंतर त्यांनी मुलीला एका निर्जनस्थळी नेऊन तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. या घटनेनंतर तरुणीने गाडगेनगर पोलिस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दिली होती. पोलिसांनी तातडीने एक पथक तयार करून तपास सुरू केला. रहाटगाव येथील आदित्य बार आणि गौरी इन हॉटेलमध्ये जाऊन सीसीटीव्ही कॅमेरे तपासले. ज्यामध्ये काही तरुण मुलीला जबरदस्तीने घेऊन जाताना दिसले. कसून चौकशी केल्यानंतर आरोपी विलास नगर येथे राहत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तातडीने विलास नगर येथे जाऊन आरोपी मनोज राजरत्न डोगरे याला अटक केली. त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर अन्य चार आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करण्यात आली. आरोपींकडून घटनेत वापरलेले मोपेड, डीओ क्रमांक एमएच 27/सीएन 7469, किंमत 40 हजार रुपये, प्लेजर वाहन 70 हजार रुपये, चारचाकी वाहन 4 लाख रुपये, असा एकूण 5 लाख 10 हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे.

# उमेदवारी अर्ज भरण्याकरता आणली 1 रुपयाची 5 हजार नाणी

**चिल्लर मोजताना अधिकाऱ्यांची दमछाक**



**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर -** 'गल्लीत गोंधळ, दिल्लीत मुजरा' या मराठी चित्रपटातील एका दृष्याला शोभेल असा प्रकार येथील एका उमेदवाराने दि.29 ला केला. एका उमेदवाराने आपला उमेदवारी अर्ज भरताना 1 रुपयांच्या तब्बल 5 हजार नाणी आपली अनामत रक्कम भरण्याकरिता आणली, जे मोजताना अधिकाऱ्यांची चांगलीच दमछाक झाली.

दर्यापूरात निवडणुकांची धामधूम सुरू आहे. विविध पक्षांच्या उमेदवारी याद्या जाहीर झाल्या असून उमेदवारी अर्ज भरण्याचीही प्रक्रिया पूर्ण झाली आहे. यातच, दर्यापूर-अजंनगाव मतदारसंघातून अपक्ष उमेदवार दिलीप गवई यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. परंतु, त्याने हटकेपद्धतीने हा उमेदवारी अर्ज भरला असून त्याने चक्क एक रुपयांची 5 हजार नाणी आपली अनामत रक्कम निवडणूक विभागाकडे जमा केली.

# इतरांचे पुनर्वसन करणारे आ.राणा स्वत: बुडीत क्षेत्रात!

## लोकसभेचा सुड उगविण्यासाठी केलेली व्युव्हरचना येणार अंगलट

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.30 ) -** लोकसभेत ज्यांनी ज्यांनी नवनित राणा यांना पराभूत करण्यास हातभार लावला, त्यांचा या विधानसभेमध्ये सुड उगवायचा अशी व्युव्हरचना करुन आजी-माजी आमदारांविरुध्द दुसऱ्या पक्षातील उमेदवारांचे पुनर्वसन करुन त्यांना या निवडणूकीमध्ये झुंजवायचा प्रयत्न करणारे आ.रवि राणा स्वतऱ्च बुडीत क्षेत्रात असल्याचे चित्र दिसत आहे. कारण त्यांच्याविरुध्द मातब्बर मंडळी बडनेरा मतदारसंघातील रिंगणात उतरत असल्याचे दिसत आहे.



उच्चश्रेणीचे यश प्राप्त करण्याकरिता परिश्रम, नियोजन आणि पैसा असा तिन्ही गोष्टींचा मेळ असणे महत्वाचे असते, बडनेरा मतदारसंघाचे आ.रवि राणा यांनी अगदी कमी वयात या तिन्ही गोष्टींचा मेळ घालत स्वतऱ आमदार झाले आणि लग्नाच्या अवघ्या काही वर्षात आपल्या पत्नीलाही खासदार केले. एकाच घरात आमदारकी आणि खासदारकी हे यशोशिखरावर पोहोचण्यासारखे होते. परंतू राणा दाम्पत्याला हे यश पचविता आले नाही, त्यांनी विकास वगळता सर्वच काही केले. जिल्हा वाकयुध्दाने पेटवित ठेवला. तोंडात येईल ते अजिबात गिळायचं नाही, फक्त ओकायचं, ऐवढेच ध्येय ठेवत ते बोलत गेले आणि राजकारणात आपले वाढविता येतील तेवढे शत्रु वाढविले. लोकसभा निवडणूक तोंडावर आली, तरी यांचे तोंड थांबले नाही, आणि परिणाम निवडणूकीत दिसून पडले. आ.बच्चु कडू यांनी दिनेश बुब यांच्या रुपाने नवनित राणा यांच्या समोर तगडे आव्हान उभे केले, दुसरीकडे आ.यशोमती ठाकुर यांनी बळवंत वानखडे यांना विजयी करण्याकरिता संपुर्ण ताकद लावली. भाजपसारखा सर्वात मोठा पक्ष राणा यांचा दिमतीला असताना तुषार भारतीय यांनी प्रचारातून एक्झीट घेतली, तर महायुतीचे काम करायचे असा युतीधर्म असतानाही अडसूळ पिता-पुत्र व संजय खोडके तटस्थ राहीले. परिणामी अवघ्या थोड्या मतांनी नवनित राणा या पराभूत झाल्या. आपल्या वाचाळ स्वभावामूळे इतके मोठे नुकसान झालेले असताना स्वभावात परिवर्तन आणणे गरजेचे होते, परंतू तसे झाले नाही.

त्यांनी लोकसभेतील पराभवाचा सुड उगविण्याचे ठरविले, आणि विधानसभेत उभ्या असलेल्या आपल्या विरोधकांना परास्त करण्याकरिता काही उमेदवार व माजी आमदारांचे पुनर्वसन केले. मात्र हे करत असताना आता स्वतऱ आ.रवी राणा स्वतऱ त्या चक्रव्युव्हात अडकत असताना दिसत आहे. प्रिती बंड या अपक्ष उमेदवाराच्या पाठीमागे शेकडो अदृश्य हात कामाला लागले आहे. जे येत्या काही दिवसात बडनेरा मतदारसंघात परिवर्तन घडवतील असे दिसत आहे.

### अशी आहे त्यांची व्युव्हरचना

अचलपूर मतदारसंघात बच्चु कडू विरोधात प्रविण तायडे यांना, मेळघाटमध्ये राजकुमार पटेल विरुध्द केवलराम काळे, दर्यापूरात अभिजीत अडसूळविरुध्द माजी आमदार रमेश बुंदीले, अमरावतीमध्ये सुलभा खोडके यांच्या विरुध्द जगदीश गुप्ता यांना उभे केले, तसेच बडनेरा मतदारसंघात शिवसेनेमध्ये दुफळी निर्माण केली.

# पोलिसांनी पकडली गावठी दारू

## 1 लाख 70 हजाराचा मुद्देमाल जप्त

## मोर्शी पोलिसांची कारवाई



**महासगर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि.30 )-** मध्यप्रदेशातून अवैध गावठी हातभट्टीची दारू महाराष्ट्रात विक्रीसाठी येत असतांना मोर्शी पोलिसांनी सापळा रचून पकडली. यावेळी सात आरोपीकडून 340 लिटर अवैध गावठी हातभट्टी दारू अंदाजे किंमत 34 हजार,90 मिलीच्या देशी पावट्या व दोन मोटरसायकल मिळून जवळपास 1 लाख 70 हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अवैध गावठी हातभटटी दारू विक्री करणायांविरूध्द मोर्शी पोलिसांनी धडक मोहीम हाती घेतली असून अवैध दारू काढणाऱ्यांचे व विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहे. मध्यप्रदेश व महाराष्ट्र राज्याच्या सीमेवर असलेल्या घनदाट जंगलात मोठ्या प्रमाणात अवैध गावठी दारू काढण्याचा गोरखधंदा कित्येक दिवसांपासून सुरू असून ही गावठी हातभट्टीची दारू मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात विक्रीसाठी आणल्या जात असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यावरून मोर्शीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख त्यांच्या मार्गदर्शनाखाली (ता. 30) सापळा रचला.

आरोपी जुगदेव शामलाल कवडे (वय 35 वर्ष रा.दाबका ता. मुलताई जि.बैतुल) हा मध्यप्रदेश राज्यातुन महाराष्ट्रात गावठी दारू घेवुन येतांना मिळुन आल्याने त्याचे ताब्यातून स्प्लेंडर मोटर सायकल क्र एम.एच 27 डि.एल 6742 कि अं 80,000 रू व काळ्या रंगाचे मोटरचे ट्युबमध्ये अंदाजे 120 लीटर गावठी हातभट्टी दारू कि.अं.12,000 रू असा एकुण 92,000 रू.चा माल जप्त करण्यात आला. तसेच अन्य आरोपी महिला आरोपी रा. घोडदेव, विजय हरीसिंग ठाकुर वय 45 वर्ष रा.रामजीबाबा नगर मोर्शी, नितीन नामदेवराव पवार वय 40 वर्ष रा.अंबाडा , राजेन्द्र नामदेवराव खडसे वय 52 वर्ष रा. पिपळखुटा, देविदास रामरावजी आहाके वय 45 वर्ष रा.हिवरखेड, अजीजशहा अहेमदशहा वय 45वर्ष रा.रामजी बाबा मंदीराचे मागे मोर्शी, विशेष मोहीम दरम्यान एकुण 7 गुन्हयात 7 आरोपीकडुनकडून उर्वरित मुद्देमाल असा एकुण 1,68,750 रू.चा माल जप्त करण्यात आला आहे. तसेच आरोपी विरूध्द कलम 65(ई) अन्वये दारूबंदी कायद्याअंतर्गत कार्यवाही करण्यात आली.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# परतवाडा ठाण्यात पोलीस महानिरीक्षकांची सरप्राईज व्हिजीट

## ठाणेदारांचा घेतला क्लास, एक महिन्याचे सीसीटीव्ही फुटेजही मागितले ?


महासागर
परतवाडा पोलीस स्टेशनमधील 'संगीत खुर्ची' थांबली!
महासागर
परतवाडा ठाण्यात पुन्हा कठपुतळीचा खेळ
ठाणेदार सुरेश मस्के कंटाळले आणि वैद्यकिय रजेवर गेले ?
तदर्थ ठाणेदार संदीप चव्हाणांचा पुन्हा राज सुरु
आता पोलीस महानिरीक्षकांनीच लक्ष घालण्याची गरज
महासागर
एलसीबीची परतवाडा हद्दीत कारवाई!
ठाणेदारच नाही, नोटीस कुणाला बजाविणार ?
महासागर
ग्रामीण पोलीस दलातील अधिकाऱ्यांमध्ये अस्थैर्य?
5 अधिकारी मॅटमध्ये, पोलीस निरीक्षकांमध्ये नैराश्याचे
फक्त चव्हाणांनाच सॉफ्ट कॉर्नर का ?
जिल्ह्याकडे पालकमंत्र्यांची पाठ ?
महासागर
पोलीस निरीक्षकांच्या बदलीत एसपींकडून भेदभाव?
कुणाची न्यायासाठी धाव, तर कुणाची गुंडाळी जशीच्या तशी ■ ग्रामीण पोलीस दलातील बदल्या चर्चेत
अधीक्षकांना ठेवले जाते अंधारात
ठाणेदार चव्हाणांची बदली चर्चेत

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.30 ) -** गेल्या काही वर्षांपासून संगीत खुर्चीत अडकलेले परतवाडा ठाणेदाराचे पद पुन्हा एकदा वादात सापडले आहे. पोलीस महानिरीक्षकांनी ठाण्यात सरप्राईज व्हिजीट देत येथील भोंगळ कारभारा बुरखा फाडत, ठाणेदाराच्या नियुक्तीवर चौकशी बसविली. त्यांनी प्रभारी ठाणेदाराचा क्लास घेत, ठाण्याचे एक महिन्याचे सीसीटीव्ही फुटेज मागविले आहे. याप्रकारानंतर परतवाडा पोलीस स्टेशनमधील कर्मचारी दिवाळीपुर्वीच फटाखे फोडत आहे.

परतवाडा पोलीस स्टेशनच्या ठाणेदार पदाला गोचीडासारखे डिकलेले अधिकारी न हटविता, पोलीस अधिक्षकांनी येथे नवीन ठाणेदाराची नियुक्ती केली. परंतू ते ठाणेदार अवघ्या काही दिवसातच अचानक सिकवर गेले. त्यामुळे या ठिकाणी कागदोपत्री कारभार शेजारी असलेल्या अचलपूर नरेशांना सोपविण्यात आला. परंतू वास्तवात हे प्रभारी ठाणेदार अचलपूरच्या परकोटाच्या आतच खुश आहेत. त्यांनी परतवाडा पोलीस स्टेशनमध्ये येण्याची तसदी घेतली नाही. कारण याठिकाणी स्वयंघोषीत ठाणेदार अनेक वर्षांपासून धूरा सांभाळत आहेत. 'दैनिक महासागर' ने परतवाडा पोलीस स्टेशनमध्ये सुरु असलेला हा प्रकार आपल्या वृत्ताच्या माध्यमातून चव्हाट्यावर आणला आहे. अशातच अमरावती परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक यांनी दिनांक 29 ला सायंकाळी 6 च्या दरम्यान परतवाडा पोलीस स्टेशनला अचानक भेट देवून या ठिकाणी अधिकाऱ्यांबरोबर कर्मचाऱ्यांची परेड घेतली. ज्यांच्याकडे परतवाड्याचा प्रभार आहे, अशा अचलपूर ठाणेदारांना देखील या ठिकाणी बोलावून घेतले. सूत्रांच्या माहिती नुसार पोलीस महानिरीक्षकांनी पोलीस स्टेशन मधील रेकॉर्ड तसेच सिसिटीव्ही कॅमेरा चे व्हिडीओ फुटेज मागितले असल्याचे माहिती आहे. या संपूर्ण प्रकरणाचा तपास अचलपूर पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ. शुभमकुमार यांच्या कडे देण्यात आला आहे. त्यामुळे आता परतवाडा पोलीस स्टेशन मधील अनेक रहस्यमय गोष्टी समोर येण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाने अधिकारी यांच्या बदली संदर्भात पोलीस महासंचालक यांना पत्रव्यवहार केला होता. मात्र राज्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत अधिकारी यांच्या बदली करणे आवश्यक होते. अचलपूर मतदार संघात एका विशिष्ट पक्षाला येथील पोलीस अधिकारी यांचा फायदा घेता यावा म्हून बदली होऊन देखील अधिकारी परतवाडा सोडायला तयार नाही. बदली झाल्यानंतर ग्रामीण पोलीस दलातील 5 अधिकारी मॅट मध्ये गेले. यावर जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी लक्ष देणे गरजेचे असतांना त्यांचे याकडे दुर्लक्ष कसे झाले हा प्रश्न निर्माण होते आहे. तसेच अमरावती जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्थेबाबत स्थानिक पालकमंत्री कधी गंभीर असल्याचे दिसून आले नाही.

### जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी देतील का लक्ष ?

जिल्ह्यात कालावधी पुर्ण होऊन देखील बदली झाली असतांना बदली च्या ठिकाणी न जाणारे अधिकारी यांची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी घेऊन त्यावर काय कारवाई करतील का ? असा प्रश्न निर्माण होत आहे.

### ते अधिकारी कोण ?

सूत्रांच्या माहिती नुसार पोलीस महानिरीक्षक यांच्या भेटी नंतर परतवाडा येथील एक पोलीस अधिकारी पोलीस महानिरीक्षक यांच्या भेटीला गेले असल्याची माहिती आहे. मात्र पोलीस महानिरीक्षक यांनी त्यांना आल्यापावली परत केल्याची माहिती आहे. नेमके ते अधिकारी कशाकरिता महानिरीक्षकांच्या भेटीला गेले होते. हे अद्याप कळु शकले नाही. मात्र पितळ उघडे पडु नये याचा पुरेपुर प्रयत्न या अधिकाऱ्याकडून होत असल्याचे दिसत आहे.

# आकाशकंदीलावर मतदान जनजागृती

**धामणगाव विधानसभा क्षेत्रातील स्वीपचा उपक्रम**



**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर रेल्वे, ( दि.30 )-** राज्यात सर्वत्र दिनांक 20 नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणूक होऊ घातली आहे. या निवडणुकी दरम्यान धामणगाव रेल्वे विधानसभा क्षेत्रातील मतदान टक्केवारी व मतदान जनजागृतीसाठी स्वीप कक्षाद्वारे विविध नावीन्यपूर्ण उपक्रमाची आखणी करण्यात आली. सध्या चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे व नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील विविध शाळांनी आकाशकंदील वर निवडणूक संदेश देत दिवाळी उत्सवासह निवडणूक उत्सव साजरा करत आहे.

जिल्हा परिषद व खाजगी शाळांतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी संकलित चाचणी 1 नंतर प्रथम सत्राच्या अखेरच्या दिवशी शाळांमध्ये दीपावली उपक्रमाचे आयोजन केले होते.यात रांगोळी रेखाटन, पणती सजावट, फलक सजावट, आकाश कंदील निर्मिती आदी विविधांगी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. दीपावली उत्सवासह निवडणूक उत्सव असल्याने याद्वारे निवडणुकीबाबत जनजागृती करण्याच्या सूचना धामणगाव विधानसभा स्वीप पथक प्रमुख तथा गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे यांनी यंत्रणेला दिल्या. चांदूर रेल्वे गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे, नांदगाव पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी प्रमिला शेंडे, धामणगावं रेल्वेच्या गटशिक्षणाधिकारी सपना भोगावकर यांच्या नेतृत्वात विविध जिल्हा परिषद तथा खाजगी शाळांवर स्वीप अंतर्गत विविधांगी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेच्या आदर्श शिक्षिका वैशाली धाकुलकर यांच्या पहिला दिवा थोर पुरुषांच्या प्रतिमा समोर प्रज्वलित करून वैचारिक वेशभूषा साकारून विचारांचा दीपोत्सव साजरा केला. यासह चांदूर रेल्वे तालुक्यातील शिरजगाव कोरडे, निंभा, मांजरखेड कसबा, राजुरा, नांदगावमधील लोणी, शेलु नटवा, येवती, लोणी, येवती, वेणी गणेशपुर, पापड, लोहगाव, मांजरी म्हसला, दाभा, धामणगाव तालुक्यातील निंबोली तरोडा, शेंदूरजना, गुंजी, मंगरूळ, तिवरा, चिंचोली, आदीसह अन्य विविध शाळांमध्ये निवडणूक स्पेशल दीपावली साजरी करण्यात आली. स्वीप कक्षात रवींद्र दिवाण, श्रीनाथ वानखडे, सुधीर केने, प्रफुल्ल नांदणे, नितीन धोटे, आर.आर.पठाण आदी परिश्रम घेत आहे.

### जनजागृती महत्वाची - संदीप बोडखे

दिवाळीचा उत्सव असल्याने या आनंदपर्वात निवडणूक कार्यात दुर्लक्ष होऊ नये व निवडणूक कार्याचा ताण येऊ म्हणून दीपावली आनंदोत्सव माध्यमातून निवडणूक जनजागृती करण्याचे ठरविले आहे. स्वीप कक्ष मार्फत 20 तारखेपर्यंत नावीन्यपूर्ण माध्यमातून जनजागृती करणार असल्याचे धामणगाव विधानसभा क्षेत्राचे स्वीप पथक प्रमुख संदीप बोडखे यांनी सांगितले.

# संशयास्पद बँकीग व्यवहाराची माहिती तातडीने सादर करा!



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.30 )-** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 ची अधिसूचना निर्गर्मित केलेली आहे. त्याअनुषंगाने अमरावती जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात दिनांक 20 नोव्हेंबर2024 रोजी निवडणूक होणार असून निवडणुका शांततापूर्ण, भयमुक्त व पारदर्शकरित्या पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाने आदर्श आचारसंहिता लागू केलेली आहे.

निवडणुक काळातील संशयास्पद बँकीग व्यवहाराची माहिती खर्च निरीक्षक यांना उपलब्ध करुन देण्याबाबत अग्रणी बँक, सर्व शासकीय व खाजगी बँक तसेच सह निबंधक, सहकारी पतसंस्था, अमरावती यांची सभा खर्च निरीक्षक वेंकन्ना तेजावथ यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच आयोजित करण्यात आली. या सभेत उपस्थित सर्व बँक अधिकारी व सह निबंधक यांना निवडणुक आयोगाने निर्देशीत केल्याप्रमाणे सर्व संशयास्पद व्यवहारांची माहिती विनाविलंब सादर करण्याची सूचना देण्यात आल्या.

नोडल अधिकारी विजय देशमुख, सहायक नोडल अधिकारी दिनेश मेतकर, अग्रणी बँकेचे व्यवस्थापक अतुल खानजोडे तसेच विविध बँकेचे प्रतिनिधी, सहकारी पतसंस्थांचे सह निबंधक आदी यावेळी उपस्थित होते.

# राजेंद्र कोकाटे यांना मातृशोक



**मोर्शी** - अंबाडा येथील श्रीमती शकुंतलाबाई रामचंद्रजी कोकाटे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय नव्वद वर्षे होते. त्यांचे पश्चात तीन मुले राजेंद्र, सुदेश आणि संजय असून सुना नातवंडे असा मोठा आप्त परिवार आहे. अंबाडा येथील हिंदू स्मशानभूमीत त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्ययात्रेला नातेवाईकांसह गावातील बराच मोठा समुदाय उपस्थित होता.

# माजी मंत्री प्रवीण पोटे यांना पितृशोक



**अमरावती**- माजी मंत्री प्रवीण पोटे यांचे वडील रामचंद्र मोतीरामजी पोटे यांना आज शुक्रवारी दि.30 ऑक्टोबर 2024 रोजी देवाज्ञा झाली. त्यांच्यावर येथील हिंदू स्मशान भूमीमध्ये अत्यंसंस्कार पार पडले. यावेळी राजकीय व इतर क्षेत्रातील अनेक गणमाण्य व्यक्ती उपस्थित होते.

# दिवाळीनिमित्त दर्यापूर बाजारपेठ सजली

**दर्यापूर** - दिवाळी सणानिमीत्त दर्यापूर बाजार पेठ विविध वस्तूंच्या खरेदीसाठी सजली आहे. दर्यापूर बाजारपेठेत विविध रंगाचे, विविध आकारांचे आकाश कंदील विक्रीला आले आहेत. विक्रेत्यांनी रंगीबेरंगी पणत्या रांगोळी, आकाश कंदील, घरगुती सजावटीचे साहित्य विक्रीसाठी ठेवले आहेत. या सणाला दिव्यांचे विशेष महत्त्व असते. यामुळे बाजारात मातीचे, चिनी मातीचे, प्लास्टिकच्या पणत्या विक्रीसाठी आलेल्या आहेत. महिला, तरुणी यांची खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून, वेगवेगळ्या आकाराच्या, रंगांचे आकारा कंदील खरेदीकडे ग्राहकांचा कल दिसून येत आहे.



नोकरदारवर्गाची दिवाळी खरेदीसाठी लगबग सुरू झाली आहे. महाराष्टात वर्षभरात साजरे केले जाणाऱ्या विविध सणांपैकी दीपावली या सणाबाबत आबालवृद्धांपासून सर्वोंनाच विशेष आकर्षण असते. पाच दिवसांच्या या सणामध्ये प्रत्येक दिवसाचे एक वेगळे दिनविशेष असल्याने प्रत्येक दिवसासाठी लागणाऱ्या विविध स्वरूपातील वस्तू खरेदी करण्यासाठी ग्राहकांनी बाजारपेठेत गर्दी करण्यास सुरुवात केली आहे. बाजारात खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांची आपल्या दुकानाला पहिली पसंती मिळावी, यासाठी दुकानदारांनीही आपापली दुकाने विविध प्रकारे सजवून ठेवली आहेत, तर किराणा सामान, फटाक्यांची दुकाने, इलेक्ट्रॉनिक वस्तू, फुलवाल्यांची दुकाने, कपड्याची दुकाने, मिठाईची दुकाने, गृहपयोगी वस्तूंची दुकाने, फटाक्याची दुकाने आदी दुकानांमध्ये गर्दी दिसत आहे.

# चार नामनिर्देशन पत्र बाद

**मोर्शी**- मतदारसंघातील तीन उमेदवारांचे चार नामनिर्देशनापत्र छाननी करताना बाद ठरवण्यात आले. त्यामध्ये प्रीतम दीपकराव धाकडे, गुलाब भगवान ढोके आणि दोन फार्म भरणारे अमोल रामराव भुयार यांचा समावेश आहे. मोर्शीच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी 29 नामनिर्देशन पत्र वैध असल्याचे जाहीर केले आहे. त्यामध्ये मान्यतापात्र राष्टीय व राज्यस्तरावरील विविध पक्षाचे 11 नामनिर्देशन पत्र असून अपक्षांचे 18 नामनिर्देशन पत्र आहेत.

# सोयाबीन विक्रीसाठी आणण्यापूर्वी तपासून घ्या!

**अमरावती** - शासनमान्य हमीभाव खरेदी केंद्रावर सोयाबीन विक्रीसाठी आणण्यापूर्वी व्यवस्थित वाळवून त्यामधील आद्रतेचे प्रमाण 12 टक्केपेक्षा कमी असल्याची व एफएक्यू दर्जाचे सोयाबीन असल्याची खात्री करावी. त्यासाठी शेतकऱ्यांनी सोयाबीनचे नमुने खरेदी केंद्रावर आणून त्यातील आर्द्रता तपासावी व ती 12 टक्केपेक्षा कमी असल्यासच सोयाबीन खरेदी केंद्रावर विक्रीसाठी आणावे. जेणेकरून जास्त आर्द्रतेमुळे शेतकऱ्यांनी सोयाबीन परत न्यावे लागणार नाही, असे आवाहन जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांनी केले आहे.

# सर्वात्मक परमेश्वराचे प्रतीक आकाशकंदील

**महासागर प्रतिनिधी**
**पथ्रोट, ( दि.30 )-** पावसाळा संपवून नवी पिके हाती आल्यावर शरद ऋतूच्या मध्यावर अश्विन आणि कार्तिक महिन्याच्या संधिकाळात हा सण येतो. या दिवसात प्रभू रामचंद्र सीतेसह चौदा वर्षाचा वनवास संपवून अयोध्येला परत आले. त्यावेळी अयोध्यातील प्रजेने दीपोत्सव केला. तेव्हापासून दरवर्षी हा उत्सव साजरा केला जातो. असे म्हणतात, की दीपज्योती हे चिरंतन सर्वात्मक परमेश्वराचे प्रतीक आहे आणि म्हणूनच दिवाळी आली, की घराघरांवर आकाशदिवे लागतात.



दिवाळी हा हिंदू धर्मातील एक अत्यंत महत्त्वाचा सण आहे. यामुळे दिवाळी सणाची सर्वच जण आतुरतेने वाट पाहत असतात. दिवाळी म्हटल्यावर फटाके, फराळ, कपड्यांची खरेदी, विविध नवीन वस्तूंची खरेदी केली जाते. यासोबतच दिवाळीसाठी आपण आपल्या घरामध्ये अनेक असे लाईट लावतो. त्यामध्ये आकाशकंदील हा सर्वात महत्त्वाचा असतो. सध्या सर्व दुकाणात आकाशकंदील दिसुन येतात. दीपावली हा सण येतो तोच झगमगत्या दिव्यांना सोबतीला घेऊन. या सणात नि ?रनिराळ्या प्रकाराच्या दिव्यांनी घरे, दुकाने, गल्लीबोळ असा सगळा परिसर झगमगायला लागतो. दीपावलीच्या काळात घरासह अंगण आणि परिसर उजळून प्रकाशमय करणाऱ्या आकाश कंदीलांची शान वेगळीच असते. पारंपरिक तसेच आधुनिक आकार घेत हा आकाश कंदिल मोठ्या दिमाखाने दिवाळीच्या दिवसांमध्ये वावरत असतो. अगदी भव्य आकारापासून पोर्चमध्ये लावल्या जाणाऱ्या चिमुकल्या आकाशकंदिलाचे सौंदर्य या दिवसांमध्ये अगदी उठून दिसते. दरवर्षी आकार आणि प्रकरांप्रमाणेच काही नवीन प्रकार आकाशकंदीलात पहावयास मिळतात. हंडी कंदील, पर्यावरणपूरक कंदील यांच्याप्रमाणेच छोट्या आकाराच्या कंदीलांनाही उत्तम प्रसिसाद असतो. हंडी कंदील प्रकारात फ्लोरोसंट हंडी, मेटॉलिक हंडी हे प्रकार उपलब्ध आहे. पॉल, मेटॅलिक, चायना प्लास्टिकचे प्रकार रंगीबेरंगी कापडी व कागदी कंदील, हॅलोग्राफी कंदील, मार्बल पेपर कंदील, वेताचा वापर केलेले कंदील, फोल्डिंगचे कंदील, झगमगते आकाशकंदील असे अनेक प्रकार पाहायला मिळतात.

### हौशी कलाकार कालबाह्य

विविध प्रकारच्या कलाकृतीचे, रचनात्मक कौशल्याचे आकाशदिवेच उच्च अभिरुची दर्शवितात असे नव्हे, तर अगदी साध्या पतंगाच्या कागदापासून तसेच जिलेटिन कागदाच्या पारंपरिक कलाकृतीही आकाशदिव्यांत सजून दिसतात पुर्वी घरोघरी हौशी स्वत: बनवायचे आधुनिक काळात ती कालबाह्य झाले. संध्याकाळी ठिकठिकाणी लखलखणारे हे आकाशदिवेच दिवाळीच्या प्रसन्न, आनंददायी वातावरणाची निर्मिती करतात. झगमगणाऱ्या दीपमाळा दिवाळीचे रोषणाई खऱ्या अर्थाने जाणवते ती लुकलुकणाऱ्या दिव्यांच्या माळा आणि झगमगणाऱ्या आकाश कंदीलांमुळेच.

# आ.देवेंद्र भुयार म्हणतात माझ्याकडे फक्त पाच लाख रुपये!

**शिक्षण बारावी पास**



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.30 )-** मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार देवेंद्र भुयार यांनी पुन्हा 2024 चे विधानसभा निवडणुकीसाठी आपले नामांकन दाखल केले असून प्रतिज्ञापत्रात दाखल केलेल्या माहितीनुसार त्यांचे वार्षिक उत्पन्न 21 लाख 36 हजार 400 रुपये असून पत्नीचे वार्षिक उत्पन्न 4 लाख 30 हजार 900 रुपये आहे. त्यांच्याकडे रोख 5 लाख रुपये तर पत्नी कडे रोख 2 लाख रुपये असल्याचे नमूद केले आहे.

देवेंद्र भुयार यांचे प्रतिज्ञापत्रानुसार त्यांच्यावर अवलंबित आई-वडील यांचे वार्षिक उत्पन्न सात लाख 42 हजार आणि आठ लाख 45 हजार 300 दाखविण्यात आले आहे. सात फौजदारी खटले प्रलंबित असून सरकारी कामात अडथळा आणल्याच्या एका प्रकरणात अपराध सिद्ध झालेला आहे. आमदार देवेंद्र भुयार यांच्याकडे चार चाकी वाहन अंदाजे 30 लाख रुपये किमतीचे दोन दोन चाकी वाहने 55 हजार व बहात्तर हजार रुपये किमतीच्या असल्याचे नमूद आहेत. देवेंद्र भुयार यांच्या पत्नीकडे केवळ दहा ग्रॅम सोने 70 हजार रुपये किमतीचे असल्याचे प्रतिज्ञापत्रात नोंद आहे. देवेंद्र भुयार यांच्याकडे स्थावर मालमत्ता बाजार मूल्यानुसार 19 लाख रुपयाची, वडिलांची नावे 30 लाख रुपयांची, आईच्या नावे 25 लाख रुपयांची आहे. स्वसंपादित मालमत्ता 4 लाख रुपयांची असल्याचे प्रतिज्ञापत्रात नमूद आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या महात्मा फुले कला व वाणिज्य महाविद्यालय वरुड येथून त्यांनी 2007 यावर्षी कला भाग एक पर्यंत शिक्षण घेतले आहे. देवेंद्र भुयार यांच्याकडे कोणत्या प्रकारचे बँकेचे कर्ज नाही.